अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७७/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/६८५ दि.११/९/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७७/२०२४

श्री.सुरज महादेव मांदळे
रा.वाघेश्वर नगर, वाघोली
ता.हवेली, पुणे-४१२२०७

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.सुरज महादेव मांदळे, रा.वाघेश्वर नगर, वाघोली, ता.हवेली, पुणे-४१२२०७, (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.१५/७/२०२४ (आ.क्र.६१८७, दि.१५/७/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४२६७, दि.२६/७/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १५/७/२०२४ | १५/७/२०२४ | १४/८/२०२४ | २६/७/२०२४ | ० |

वर्ग अ ते ड मधील पदोन्नतीच्या अनुषंगाने परिक्षेच्या कालावधीतील कार्यालयामार्फत आवश्यक असलेल्या रजाबाबत माहिती मागणी केली आहे. लेखी छापील उत्तर देऊन माहिती टाळलेली आहे. परिक्षा ऑनड्युटी देता येतात किंवा कसे याबाबत कार्यप्रणाली मागविण्यात आली मात्र माहिती दिली नाही, असे नमूद

करुन दि.१४/८/२०२४ रोजी (आ.क्र. ८७६४ दि.१४/८/२०२४ व ८७९३ दि.१६/८/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १४/८/२०४ | १४/८/२०२४ व १६/८/२०२४ | २५/८/२०२४ | होय | -- |

सदर अपिलाची सुनावणी दि.९/९/२०२४ रोजी ११.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/.६४०२ दि.१५/९/२०२४, रोजी कळविण्यात आले आहे. सुनावणी प्रथम दि.३/९/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती मात्र अपिलार्थी यांना रुग्णालयात जावे लागल्याने अपिल सुनावणी रद्द करुन दि.९/९/२०२४ रोजी पुन्हा सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते .

## विवेचन

वर्ग अ ते ड मधील पदोन्नतीच्या अनुषंगाने परिक्षेच्या कालावधीतील कार्यालयामार्फत आवश्यक असलेल्या रजाबाबत माहिती मागणी केली आहे. लेखी छापील उत्तर देऊन माहिती टाळलेली आहे. परिक्षा ऑनड्युटी देता येतात किंवा कसे याबाबत कार्यप्रणाली मागविण्यात आली मात्र माहिती दिली नाही, असे नमूद करुन दि.१४/८/२०२४ रोजी (आ.क्र. ८७६४ दि.१४/८/२०२४ व ८७९३ दि.१६/८/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.१५/७/२०२४ (आ.क्र.६१८७ दि.१५/७/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. वर्ग अ ते ड अधिकारी कर्मचारी यांचे पदोन्नतीच्या अधिकारी कर्मचारी यांचे पदोन्नतीच्या अनुषंगाने सदर परिक्षेच्या कालावधीत कार्यालयामार्फत आवश्यक असलेल्या रजा इ.संपूर्ण माहिती मिळणेकामी मुद्दा क्र.१ ते ३ माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४२६७, दि.२६/७/२०२४ अन्वये अर्जास उत्तर देऊन शुल्क भरणेबाबत कळविण्यात आले आहे.

पदोन्नतीच्या आवश्यक परिक्षांसाठी बसणाऱ्या वर्ग १ ते ४ सेवकांच्या रजेबाबत नियमांची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर पटले नाही. माहिती करिता आवश्यक शुल्क भरण्यास तयार आहे. अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

मूळ माहिती अधिकार अर्जात मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर देण्यात आले आहे. तसेच अभिलेखे उपलब्धतेबाबत शुल्क विहित मुदतीत कळविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

माहिती अधिकाराच्या मूळ अर्जामधील माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. मात्र, मुद्दा क्र.१ व २ ची माहिती देणे शक्य आहे. पदोन्नतीसाठी असणाऱ्या परिक्षांबाबत उपलब्ध शासन निर्णय व रजेबाबतचे नियम देणे शक्य आहे. मुद्दा क्र.३ मध्ये रजा मंजूरीचे अधिकार संबंधित खातेप्रमुखास आहेत. सबब, अशाप्रकारची माहिती किंवा नियम याबाबत माहिती उपलब्ध नाही, असे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग यांनी मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ ची माहिती शुल्क आकारून आदेश प्राप्तीपासून ७ दिवसांचे आत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.७७/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
11-9-24

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.